**MHPU**200029392022

<u>नि.क्र.५ वरील आदेश :–</u>

प्रस्तूतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ मधील २३ खाली अंतरीम आदेश मिळणे बाबत दाखल केला आहे.

२) <u>अर्जातील थोडक्यात हकीगत अशी की,</u>

अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह दि. २५.०३.२०२२ रोजी गुणोरे, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे झाला. सदर विवाहाचा संपूर्ण खर्च अर्जदाराचे आई–वडीलांनी केला आहे. जाबदेणार यांनी अर्जदाराला सुरुवातीचे पंधरा दिवस व्यवस्थित नांदविले. त्यानंतर, जाबदेणार क्र. १ ते ५ या सर्वांनी मिळून अर्जदाराचा मानसिक, शारिरीक व घरगुती हिंसाचार केलेला आहे. जाबदेणार यांनी मोटारसायकल व लॅपटॉप आणण्याकरिता देखील अर्जदारास भाग पाडले. अर्जदारास सोन्या करितादेखील तिचा छळ केला. जाबदेणार क्र. १ अर्जदाराच्या बँक खात्यातून रु.७४,०००/– वेळोवेळी काढून घेतले. जाबदेणार क्र. १ हा वेळोवेळी अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असत. दि. ०४.०८.२०२२ रोजी अर्जदार ह्या सायंकाळी ६.०० वाजता घरी आल्या असता, जाबदेणार क्र. १ व २ यांनी अर्जदारास बेदम मारहाण करुन माहेरुहून २० लाख रुपये घेवून ये, तरच तुला आम्ही नांदवू अशी धमकी देवून अर्जदाराच्या अंगावरील दागदागिने काढून घेवून अर्जदारास नेसत्या वस्त्रानिशी घरातून हकलून दिले. अर्जदाराने त्याबाबत बेलवंडी पोलिस स्टेशन येथे गुन्ह्याची तक्रार नोंद केलेली आहे. अर्जदाराने आपल्या अर्जामध्ये असेदेखील नमूद केले आहे की, जाबदेणार क्र. १ हा नपुसंक असून त्याने ही बाब लपवून लैंगिक चाचणी करुन घेण्यास जाणीवपूर्वक नकार देवून अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला घरातून हकलून दिले आहे.

३) अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, जाबदेणार क्र. १ याची नपुसंक असलेली बाब अर्जदार हिला समजल्याने ती कायदेशीर कारवाई करेल या रास्त भितीने जाबदेणार क्र. १ ने अर्जदारास वकीलामार्फत खोट्या आशयाची नोटीस पाठविली. अर्जदार सध्या आपल्या मामाकडे मौजे पिंपरी दुमाला, ता. शिरुर येथे कसेबसे जीवन जगत आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिच्या अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य इत्यादी गोष्टींची जाबदेणार क्र. १ ने कधीही तसदी घेतली नाही. याउलट जाबदेणारांची मौजे रायगव्हाण व मौजे ढवळगांव ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे ७५ एकर बागायत शेती असून त्यामध्ये ते उस, कांदा तसेच, सिताफळ, संत्रीचे पिके घेत आहेत. तसेच, जाबदेणार यांचे मालकीच्या ढवळगांव ता.श्रीगोंदा येथे ६-७ घर मिळकती असून मौजे विठ्ठलनगर, शिरुर येथे फ्लॅट असून मार्केटयार्डमध्ये त्यांचे मालकीचे दोन गाळे आहेत. तसेच, पुणे येथे अप्पा बळवंत चौकामध्ये एक गाळा असून नारायण पेठेत एक फ्लॅट आहे. सदरचे गाळे व फ्लॅट हे जाबदेणार यांनी भाड्याने दिला असून सदर गाळ्याचे व फ्लॅटचे भाड्यापोटी जाबदेणार यांना रु. १,२०,०००/- दरमहा भाडे मिळते. सबब, अर्जदाराने अंतरिम पोटगी दरमहा प्रत्येकी रु. १०,०००/- व दरमहा घरभाडे रु. १५,०००/- जाब देणार क्र. १ याचेकडून मिळण्याची विनंती केलेली आहे.

४) याउलट जाबदेणार यांनी त्यांचे लेखी जबाब नि.क्र. १४ वर दाखल करुन अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. त्यांच्या कथनानुसार जाब देणार यांनी अर्जदाराचा कुठल्याही पध्दतीचा घरगुती हिंसाचार केला नाही. जाब देणार क्र. १ यांचे वडिलांचे कोरोना काळामध्ये निधन झाले. त्यामुळे घरातील सर्व सदस्यांनी कौटुंबिक जबाबदारी सांभाळावी या हेतुने जाब देणार क्र. १ याचे लग्न करण्याचे ठरविले. त्यानंतर अर्जदार हिचे आई-वडीलांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असतानादेखील जाब देणार क्र. २ यांनी अर्जदार व जाब देणार क्र. १ यांच्या विवाहाचा मोठा वाटा उचलला व त्यांचे लग्न लावून दिले. जाब देणार क्र. २ ते ५ यांनी कधीही अर्जदार हिचेवर शारिरीक व्यंगावर तिच्या शरीराच्या ठेवणीवर टिपणी केली नाही. जाब देणार क्र. ३ व ४ हे नोकरीनिमित्त पुणे येथे राहतात व जाब देणार क्र. ५ हिचेदेखील लग्न

झालेले असून ती पुण्यामध्ये राहते. जाब देणार क्र. १ हा अत्यंत मवाळ स्वभावाचा आहे. याचाच फायदा घेवून अर्जदार हिने जाब देणार यांच्या कुटुंबियांवर नियंत्रण मिळविण्याकरिता वेगवेगळ्या प्रकारे चुकीच्या गोष्टी करण्यास सुरुवात केली. अर्जदार ही उच्चशिक्षित असून तिला नोकरी करण्यास देखील जाब देणार यांनी परवानगी दिली होती. अर्जदार ही नोकरीच्या वेळेआधी घरात जावू लागली व रात्री उशिरा घरी येत असत. त्याबाबत काळजीपोटी विचारपूस केली असता ती उलट उत्तर द्यावयाची. अर्जदार ही जाब देणार क्र. १ याचेकडे विकृत इच्छा आकांक्षाची मागणी करित असे. अर्जदार हिचे विकृत वर्तन घरात उघड केल्यामुळे अर्जदाराने जाब देणार क्र. १ हे नपुसंक असल्याचा खोटा बनाव करण्यास सुरुवात केली.

५) जाब देणार क्र. १ याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही परपुरुषांशी बोलत असत व रात्री उशिरापर्यंत फोनवर मेसेजद्वारे अनोळखी व्यक्तीशी संवाद साधत असत. ती घरातील कोणत्याही कामाला हात लावत नसत. शेवटी गोष्टी मर्यादेच्या बाहेर जावून असहाय्य होवू लागल्यावर जाब देणार क्र. १ व २ यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता जाणीवपूर्वक भांडण सुरु करुन अर्जदार ह्या त्यांचे व्हीडिओ रेकॉर्डिंग करुन खोटे पुरावे तयार करु लागल्या व त्या आधारे पोलिस स्टेशनला जावून खोटी तक्रार दाखल करुन अर्जदार जाब देणार क्र. १ यांच्या संपूर्ण कुटुंबास ब्लॅकमेल करु लागल्या. अर्जदार हिने दि. २३.०९.२०२२ रोजी सकाळी ९.०० वाजणेच्या सुमारास आपले माहेरचे लोकांना बोलावून जाब देणार क्र. १ व २ यांना अमानुषपणे मारहाण व शिवीगाळ केली त्याबाबत जाब देणार यांनी बेलवंडी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. अर्जदार यांच्यावर कोणताही घरगुती हिंसाचार घडलेला नाही. अर्जदार हिने अहंकाराने जाब देणार क्र. १ यास नमविण्यासाठी व त्याचे कुटुंबाचे पथन करण्यासाठी खोटे नाटे आरोप केलेले आहेत. अर्जदार ही नोकरीस असून स्वतः पैसे कमवून स्वतः ची उपजिवीका भागविण्यास सक्षम आहे. ती स्वतःहून जाब देणार यांचे घर सोडून गेलेली आहे व आजरोजी स्वतःच्या घरी राहत आहे. अर्जदार हिने जाब देणार व त्यांचे कुटुंबाचा आतोनात मानसिक व आर्थिक छळ केलेला आहे. त्यामुळे अर्जदार ह्या जाब देणार

यांच्याकडून पोटगी मिळण्यास सक्षम नाही. सबब, जाबदेणार यांनी अर्जदार हिचा अर्ज खर्चासहीत नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६) अर्ज नि.क्र.५ व निशाणी क्र. १४ वरील म्हणणे वाचले. अर्जदार व जाबदेणार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

७) खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थीत झाले असुन त्यावरील माझे निष्कर्ष मी खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) अर्जदार प्रथम दर्शनी हे शाबीत करते काय की, जाबदेणार यांनी तिचे वर कौटुंबीक हिंसाचार केला ? | होय. |
| २) अर्जदार अंतरीम निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास, किती ? | होय. अर्जदार ही जाबदेणार क्र.१ याचे कडून रु.५,०००/– (रु.पाच हजार फक्त) पोटगी व रु.३,०००/– (रु.तीन हजार फक्त) घरभाडे. |
| ३) आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ साठी** : –

८) जाबदेणारांनी अर्जदार क्र. १ चा कौटुंबिक हिंसाचार केला किंवा नाही हे निश्चीत करण्यापुर्वी हिंसाचार (domestic violence) म्हणजे काय ते पाहणे आवश्यक आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे पिडीत व्यक्तीचा कुटूंबातील सदस्यांनी केलेला शारिरीक, लैंगिक, भावनिक व आर्थिक दुरुपयोग होय. सदर दुरुपयोगापैकी एक जरी शाबीत झाला तरी पिडीत व्यक्तिचा कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे मानता येईल. परंतु, प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरीम अनुतोष मिळणेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर तरतुदीनुसार गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्यास आणि तसा हिंसाचार ते करण्याची शक्यता असल्यास सदर अधिनियमाचे कलम १८ ते २२ प्रमाणे अर्जदारास तूर्तातूर्त अनुतोष मागता येतो. त्यामुळे सदर अर्जाच्या निर्णयासाठी जाबदेणारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृत दर्शनी शाबीत होणे गरजेचे आहे.

९) जाबदेणार यांनी अर्जदारास वेगवेगळया कारणावरुन जसे की, तिचे वजनावरुन, हुंड्यावरुन अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे तिने कथन केले आहे. अर्जदाराने दि. २३.०९.२०२२ रोजी बेलवंडी पोलिस स्टेशन येथे दिलेल्या एफ.आय.आर. ची प्रत, दि. ०६.०८.२०२२ रोजी जाब देणार यांच्याविरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत व जाब देणार यांचेविरुध्द बेलवंडी पोलिस स्टेशन येथे दिलेल्या एन.सी.आर. क्र. ७४८/२०२२ ची प्रत दाखल केलेली आहे. तिचे उपरोक्त कथनास दुजोरा तिचे अर्जाच्या पुष्ट्यर्थ दाखल केलेल्या अर्ज, शपथपत्रावरुन व अर्जदार हिने जाबदेणार यांचेविरुध्द पोलीसस्टेशन येथे केलेल्या तक्रारी अर्जावरुन मिळतो. अर्जदाराचा छळ करण्यात आला होता त्यामुळे तिला मौजे पिंपरी दुमाला येथे आपले मामाच्या गावी राहत आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. जाबदेणार यांनी अर्जदाराचा शारिरिक व मानसिक छळ केला, याचा विचार होणे गरजेचे आहे.

१०) जाबदेणार यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर होऊन अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. परंतु, अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास झाला नसल्या संदर्भातील कुठलाही कागदोपत्री पुरावा जाबदेणारांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार

आजरोजी तिचे मामा दौलत चिखले यांच्याकडे राहत असून सदर कथनाच्या पुष्टीअर्थ तिने दौलत चिखले यांचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. २२ वर दाखल केलेले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्याने असे नमूद केले आहे की, मौजे जवळा, ता.पारनेर येथे अर्जदाराच्या माहेरी कोणीही राहत नसून ती ऑगस्ट २०२२ पासून त्यांचे घरी मौजे पिंपरी दुमाला, ता.शिरुर येथे राहत असून स्वतः चा कसाबसा उदरनिर्वाह करित आहे. त्यामुळे जाबदेणाराने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते असे माझे मत आहे. सबब मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ साठी</u>** : –

११) अर्जदारांनी दरमहा अंतरीम निर्वाह भत्ता प्रत्येकी रु.१०,०००/– व घरभाडे रु. १५,०००/– मंजूर करण्याची मागणी केली आहे. कोणत्याही स्त्रिचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाहभत्त्याची जबाबदारी तिच्या पतीवर असते. ***'निर्वाह भत्ता'*** या शब्दाची *व्याख्या हिंदू दत्तक विधान व निर्वाह कायदा, १९५६ चे कलम ३ (ब) मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. निर्वाह भत्ता म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधोपचार यासाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद होय.* पत्नीचे पालनपोषण करणे ही प्रत्येक पतीची नैतिक जबाबदारी असते. पत्नीचे व मुलाचे पालणपोषण करणे जरी प्रत्येकाची नैतिक जबाबदारी असते तशीच स्वतःच्या आई वडीलांचे पालणपोषण करणे सुध्दा प्रत्येकाची नैतिक जबाबदारीच असते.

१२) अंतरीम निर्वाह भत्ता मिळण्यास अर्जदार पात्र आहे किंवा नाही ही बाब निश्चित करण्यासाठी जाबदेणार यांनी त्यांचा कौटुंबिक हिंसाचार केला किंवा नाही हे पहावे लागेल. त्यासाठी वादप्रश्न क्र.१ च्या निष्कर्षाचा विचार करणे आवश्यक आहे. जाबदेणार यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला असल्याचे वादप्रश्न क्र.१ च्या निष्कर्षान्वये सकृत दर्शनी शाबीत झालेले आहे. अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे काय आणि तिचा उदरनिर्वाह करण्याइतपत जाबदेणार यांची आर्थिक ऐपत पुरेशी आहे काय या प्रश्नांची उत्तरे

शोधावी लागतील. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, जाबदेणारांची मौजे रायगव्हाण व मौजे ढवळगांव ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे ७५ एकर बागायत शेती असून त्यामध्ये ते उस, कांदा तसेच, सिताफळ, संत्रीचे पिके घेत आहेत. तसेच, जाबदेणार यांचे मालकीच्या ढवळगांव ता.श्रीगोंदा येथे ६–७ घर मिळकती असून मौजे विठ्ठलनगर, शिरुर येथे फ्लॅट असून मार्केटयार्डमध्ये त्यांचे मालकीचे दोन गाळे आहेत. तसेच, पुणे येथे अप्पा बळवंत चौकामध्ये एक गाळा असून नारायण पेठेत एक फ्लॅट आहे. सदरचे गाळे व फ्लॅट हे जाबदेणार यांनी भाड्याने दिला असून सदर गाळ्याचे व फ्लॅटचे भाड्यापोटी जाबदेणार यांना रु. १,२०,०००/– दरमहा भाडे मिळते.

१३) अर्जदारांनी आपल्या कथनाच्या पुष्टीयर्थ आपले मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच, अर्जदाराने जाब देणार यांचे मौजे ढवळगांव येथील मिळकतीचे गट क्र. २३९, ३२३, ३४०, ३२९, १५४, २६१, २५३, २६३, ३५७ व ३१८ चे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता जाब देणार यांच्या उत्पन्नाच्या कथनास पुष्टी मिळते. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता जाब देणार यांच्या नावे अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे शेती असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. जाबदेणार क्र. १ च्या असलेली शेतजमिन ह्या एकत्र कुटुंबाची आहे किंवा कसे ही बाब पुराव्याअंती शाबीत होणार आहे. परंतु, सद्यस्थितीला जाब देणार क्र. १ च्या नावाने शेतजमिन असल्याचे दिसून येते. अर्जदाराने हिने जाब देणार यांचे नावे असलेल्या शिवाजी नगर, पुणे येथील विद्युत कनेक्शन बिलाची प्रत, जाब देणार यांच्या नावे असलेल्या विद्युत कनेक्शन बिलाची प्रत, जाब देणार यांचे मालकीचे नारायण पेठ, पुणे येथील सी.टी. स. क्र. ४६९ व ३४ चा मालमत्ता पत्रक उतारा, दस्त क्र. ३४१७/२०१८ ची भाडेपट्टा क्रमांक सूची क्र. २ ची प्रत, दस्त क्र. १७५५/२०२२ ची भाडेपट्टा क्रमांक सूची क्र. २ ची प्रत, प्रेरणा शिक्षण संस्था, ढवळगांव यांचे ठरावाचे प्रत व जाब देणार यांचे नावे असलेल्या फ्लॅटचे छायाचित्रे दाखल केलेले आहेत. सदर प्रेरणा शिक्षण संस्थेचे अपॉंयटमेंटचे पत्र पाहिले असता जाब देणार

क्र. १ यास सन २००६ मध्ये लिपीक म्हणून संत ज्ञानेश्वर महाविद्यालयामध्ये नियुक्ती दिल्याचे दिसून येते. तो आजरोजी सदर संस्थेमध्ये नोकरीस आहे किंवा कसे तो कायम स्वरुपी आहे किंवा अस्थायी आहे ही बाब पुराव्याअंती शाबीत होणार आहे.

१४) याउलट जाबदेणार यांनी अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत असे कथन केले की, अर्जदार ही उच्चशिक्षित असून ती नोकरी करते. जाब देणार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार ही उच्चशिक्षित असून ती नोकरी करित आहे त्यामुळे ती पोटगी मिळण्यास पात्र नाही. जाब देणार यांचे विधीज्ञांनी आपले कथनाचे पुष्टीयर्थ आपली भिस्त पुढील न्यायनिर्णयावर ठेवली आहे –

*01.* ***MAT. Application (F.C.) 248/2019 and CM application 20720/2022*** *wherein it was observed in para No. 13 by the Hon'ble Delhi High Court that in that case, appellant is highly qualified and has an earning capacity, but, in fact she has been earning, though has not been inclined to truthfully disclose her true income. Such person cannot be held entitled to maintenance.*

*02.* ***Manokaran @ Ramamoorthy Vs. M. Devaki AIR 2003 MAD 2012****.*

*03.* ***Smt. Mamta Jaiswal Vs. Rajesh Jaiswal.***

१५) अर्जदार ही निश्चितच उच्च शिक्षित आहे परंतू, अर्जदार ही आजरोजी कुठे काम करते याबाबतचा कुठलाही कागदोपत्री पुरावा जाब देणार यांनी अभिलेखावर दाखल केला नाही. कमाई करण्यास सक्षम आणि खरे तर कमाई हया दोन भिन्न संकल्पना आहेत. केवळ पत्नी उच्च शिक्षित आहे किंवा कमवती असल्याने तिचा भरनपोषणाचा अधिकार रोखता येणार नाही. सबब, मी न्रमपणे नमूद करु इच्छीतो की, उपरोक्त नमूद मा. सर्वोच्च व उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय मधील विधित केलेले तथ्य हे प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांशी लागू होत नाही.

१६) अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचे पतीपत्नीचे नाते आजपावेतो कायम आहे ही बाब उभयपक्षांना मान्य आहे. जाबदेणार क्र.१ याने अर्जदारांच्या पालनपोषणाची कोणतीही

जबाबदारी निभावल्याचे दिसून येत नाही.

१७) प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराने केलेली मागणी निश्चीतच अवास्तव व अवाजवी स्वरुपाची आहे. कायद्यात तरतुद आहे म्हणून त्या तरतुदीचा वापर कसाही करता येत नाही. **कायद्याचा वापर ढाल म्हणून करावयाचा असतो, तलवार म्हणून नाही**. जाबदेणार क्र.१ च्या उत्पन्नाचा व आर्थिक परिस्थितीचा विचार करता अर्जदाराची प्रत्येकी रु. १०,०००/– (रु. दहा हजार फक्त) अंतरीम निर्वाह भत्ता व रु. १५,००० (रु. पंधरा हजार फक्त) मिळण्याची मागणी मंजूर करणे योग्य होणार नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणाची चौकशी होऊन न्यायनिर्णय होण्यास कांही अवधी लागणार आहे. अर्जदार व जाबदेणार हे सध्या नोकरीवर आहेत की कसे त्यांच्या व इतर कोणी अवलंबून आहे कि कसे सदर बाबी मुख्य अर्ज निकाली काढताना विचारात घेण्यात येईल. अर्जदारास तिच्या उदरनिर्वाहाकरीता आर्थिक मदतीची गरज आहे. सदर जबाबदारी पती या नात्याने जाबदेणार क्र. १ याचेवरच येत आहे. सध्याच्या काळात महागाईचा वाढत असलेला आलेख, दैनंदिन मुलभूत गरजा, औषधोपचाराकरीता लागणारा खर्च, निवासाची सोय करण्याकरीता लागणारा किमान खर्च व इतर किरकोळ खर्च विचारात घेता व जाब देणार क्र.१ चे उपरोक्त निष्कर्षित उत्पन्नापैकी रक्कम रु. ५,०००/– इतका अंतरीम निर्वाह भत्ता व रु. ३,०००/– इतके घरभाडे अर्जदार हिस देणे न्यायोचित होईल. सबब मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ साठी</u>** : –

१८) कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असलेल्या महिलांच्या हक्काचे परीणामकारक संरक्षण करण्याचा कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे सदर कायद्याचा उद्देश जोपासण्याच्या दृष्टीने आणि मुद्दे क्र.१ व २ च्या निष्कर्षान्वये अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब मुद्दा क्र.३ च्या निष्कर्षासाठी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

# आ दे श

१) अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदेणार क्र.१ याने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला अंतरीम निर्वाह भत्ता दरमहा रु.५,०००/- (रु. पाच हजार फक्त) व घरभाडे दरमहा रु.३,०००/- (रु. तीन हजार फक्त) या प्रकरणाच्या अंतिम सुनावणी पर्यंत देण्याचे या द्वारे निर्देशित करण्यात येत आहे.

३) सदर प्रकरण पुढे चालविण्यास अर्जदाराने विलंब केल्यास त्यांना मंजूर करण्यात आलेला तुर्तातुर्त अनुतोष रद्द करण्यात येईल.

४) आदेशाची प्रत पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

PRATIK SOPANRAO SONKAMBLE
Digitally signed by PRATIK SOPANRAO SONKAMBLE
Date: 2024.10.14 13:42:38 +0530

( प्रतिक सो. सोनकांबळे )

दि. १०.१०.२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे.

## प्रतिज्ञापत्र

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, प्रस्तुत फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पिठासीन अधिका-याचे नाव | ः | **पी.एस.सोनकांबळे.**<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>घोडनदी-शिरूर, जि.पुणे |
| लघुलेखकाचे नाव | ः | पी. एस. गुळगी,<br>लघुलेखक श्रेणी - ३. |
| आदेशाची तारीख | ः | १०.१०.२०२४ |
| आदेशावर सही झाल्याची तारीख | ः | ११.१०.२०२४ |
| आदेश अपलोड दिनांक | ः | १४.१०.२०२४ |